दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/ MHT CET-2021/2021/ 292

दिनांक : 20 JAN 2021

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये MHT CET-2021 या सामायिक प्रवेश परीक्षेकरीता केंद्र निश्चिती करतांना शासकीय व शासन अनुदानित संस्थांना प्राधान्य देण्याबाबत व त्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत

संदर्भ : संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२१/२६ दिनांक १८ जानेवारी २०२१.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत आयोजित प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, फार्म डी पदवी अभ्यासक्रमांच्या MHT CET-2021 या सामायिक प्रवेश परीक्षेसाठी कोविड १९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर सदरच्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना दूर अंतरापर्यंत परीक्षा केंद्रावर जावे लागू नये यासाठी तालुकास्तरावरील परीक्षा केंद्रांची माहिती सादर करणेबाबत संचालनालयाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविलेले आहे.

या अनुषंगाने सर्व सस्थांना सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेस MHT CET-2021 या सामायिक प्रवेश परीक्षेसाठी सामायिक प्रवेश परीक्षा केंद्र निर्धारीत करण्यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कळविल्यानुसार सोबत जोडलेल्या आवश्यक उपलब्धतेच्या संसाधनांच्या यादी प्रमाणे आवश्यक hardware and software specifications MHT CET-2021 आणि इतर आवश्यक संसाधने सोयी सुविधा या आपल्या संस्थेमध्ये आहेत किंवा कसे याबाबत शहानिशा करावी. कमीत कमी १०० परीक्षार्थींची परीक्षा घेता यावी इतकी परीक्षा केंद्राची क्षमता असावी.

तसेच प्रवेश परिक्षा केंद्रासाठीच्या सुविधा पूर्णपणे उपलब्ध नसल्यास संस्थेमध्ये hardware and software specifications आणि इतर आवश्यक संसाधने सोयी सुविधाची पुर्तता करण्यासाठी खरेदी करावयाच्या साहीत्याच्या तपशीलासह आवश्यक निधीचा प्रस्ताव संचालनालयामार्फत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करणेसाठी या कार्यालयास **दिनांक ०५/०२/२०२१ पर्यंत** न चूकता सादर करावा. तसेच याबाबतची माहिती निरंक असल्यास तसे कळवावे.

तसेच सर्व संस्थांनी MHT CET-2021 परीक्षेच्या आयोजनासाठी सज्ज राहावे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सविनय सादर

Adagale:Admission 2021-22

iLEON OS is mandatory to conduct the assessment. Hence, ensure the iLEON OS is compatible on suggested computers.

Please find the Client PC Minimum Hardware Requirement

Processor:- Intel Dual Core and above
RAM:- 4GB and above
HDD Space:- 250GB
Motherboard: Motherboard should have PXE enabled LAN card. (For Netboot OS)
Monitor – 16 inches and above
Monitor Should support screen resolution of 1024 X 768.
Keyboard should not be multimedia.

Network Requirement

Network Switch- GBPS
LAN Cable- CAT6
Distribution Layer switch should be manageable and loop prevention enabled.

Network Architecture

Modular Network.
STAR Topology
Physically Separate network for assessment.

Power Requirement

**Good to have:** UPS, DG Set

**Note- Finalisation of the center is only accepted if that will approve from the TCS iON audit.**